# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०४/२०२५ (शुक्रवार)**

---

## पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून चोर आल्याची खोटी बातमी पसरविणाऱ्या आरोपी विरूध्द अदखलपात्र गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान** :— आरोपी नामे पवन विनायक उके, वय २९ वर्षे,रा जुनी कामठी यांने **चोरोसे सावधान यां नावाने एक व्हॉट्सॲप ग्रुप बनवुन त्यात** फिर्यादी नामे प्रदिप बाबुराव उके ,वय ३४ वर्षे, रा. जुनी कामठी यांच्यासह गावातील १४५ लोकांना त्या ग्रुपचे सदस्य केले. होते. चोरोसे सावधान यां व्हॉट्सॲप ग्रुपवर द्वारे मागील ८ दिवसांपासुन जुनी कामठी येथे चोर आले म्हणुन खोटी अफवा पसरविणे सुरू आहे. त्यामुळे तेथील जनसामन्य हे रात्रभर जागुन खोटया अफवेनुसार चोरांचा शोध घेत आहे. त्या व्हॉट्सॲप ग्रुप मधील सदस्य तेजस दिलीप भुरे वय २५ वर्षे, रा जुनी कामठी याने एक विवादीत व्हीडीओ पोस्ट केला. परंतु तो व्हिडीओ कामठी गावातील नव्हता.केवळ जनतेमध्ये चोर आल्याची खोटी अफवा पसरविण्यासाठी हा व्हिडीओ शेअर केला होता. आरोपी नामे पवन विनायक उके, वय २९ वर्षे,रा जुनी कामठी यांने चोरोसे सावधान यां नावाने एक व्हॉट्सॲप ग्रुप बनवुन तसेच आरोपी क्र २ तेजस दिलीप भुरे वय २५ वर्षे, रा जुनी कामठी यांनी विवादीत व्हिडीओ टाकुन जनसामान्याच्या मनात भिती निर्माण होईल अशा खोटया अफवा परसविल्याने फिर्यादीने आरोपीतांना या बाबत विचारणा केली असता आरोपी पवन विनायक उके याने तो ग्रुप डिलीट केला.

**फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून नमुद दोन्ही आरोपीतांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३५३(१),३(५) भारतीय न्याय संहीता २०२३ अन्वये अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नागपुर ग्रामीण पोलीस दलांतर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, कोणीही असे व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून किंवा इतर माध्यामांतुन खोटया अफवा पसरविल्याबाबत माहीती प्राप्त होताच नजीकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी तसेच असे करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे कयदेशिर कारवाई करण्यात येईल.**

# सराईत घरफोडी गुन्हेगारास अटक, ०८ गुन्हे निष्पन्न, एकुण १२,०५,६५०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त, सावनेर पोलीसांची कारवाई

दिनांक ०७/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन सावनेर अपराध क्रमांक २५४/२४ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.संहीता मधील पेट्रोलींग दरम्यान पकडलेला आरोपी **नामे संकेत ईश्वर गेडाम वय २७ वर्ष रा. रागीट लेआउट मराठा बारच्या मागे सावनेर जि. नागपुर** यास अटक केली असता, त्याला पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत झालेल्या घरफोडी बाबत विचारपूस केली असता त्याने खालील गुन्ह्याची कबुली देवुन **सदर ०७ गुन्ह्यातील एकुण १०,९५,६५०/— रुपये मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले दोन मोटरसायकल १,१०,०००/— रुपये असा एकुण १२,०५६,५०/— रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

- **१) अप क्र. २५४/२५ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.सं. मध्ये** सोन्याचांदीचे दागिने असा मुद्देमाल चोरीस गेला होता. **मिळालेला मुद्देमाल १) २१.२५० ग्रॅम पिवळ्या धातुची सोन्याची लगड किंमत १,५०,०००/— रुपये,२) १२ नग पांढ—या धातुच्या पायल वजन ६९४.५०० मिलीग्रॅम किंमत ३०,०००/— रुपये ३)१६ नग पांढ—या धातुच्या बि—या वजन ५४ ग्रॅम किंमत २२५०/— रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**
- **२) अप क्र. ३०५/२५ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या संहिता मध्ये** सोन्याचे दागिने असा एकुण १३,०००/— रुपयाचा मुद्देमाल चोरीस गेला होता. मिळालेला मुद्देमाल १) **सोन्याचे कानातील टाप्स एक ग्रॅम किमत ५०००/— रुपये २) सोन्याचे कानातील बेसर एक ग्रॅम किंमत ३०००/— रुपये व नगदी ५,०००/— रुपये असा एकुण १३,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**
- **३) अप क्र.३०७/२५ कलम ३३१(३)(४),३०५(अ) भा.न्या संहिता मध्ये** बेन्टेक्सचे दागीने किंमत ५,९००/— रुपये २) १,०००/— रोख रक्कम असा मुद्देमाल चोरीस गेला होता. **मिळालेला मुद्देमाल १)बेन्टेक्सचे दागीने किंमत ५,९००/— रुपये २) १,०००/— रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

- ४) **अप क्र. ३१०/२५ कलम ३३१(३)(४),३०५(अ) भा.न्या संहिता मध्ये** सोन्याचे दागिने आणि ऐवज असा एकुण ५७,५००/— रुपयेचा मुद्देमाल चोरीस गेला होता. **मिळालेला मुद्देमाल १) ३ नग सोन्याचे चौन टाप्स ३.६१० मिलीग्रॅम किंमत १८,०००/— रुपये २) २ नग कानातील सोन्याच्या बिऱ्या ६.३५० मिलीग्रॅम किंमत १६,०००/— रुपये ३) सोन्याचे लॉकेट २.१० मिलीग्रॅम किमत ११,०००/— रुपये ४) कानातील सोन्याचे खडे २.६८० मिलीग्रॅम किमत ११,०००/— रुपये ५) सोन्याचा कानातील २ नग खडे ०.२९० मिलीग्रॅम किंमत ५००/— रुपये एकुण ५७,५००/— रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**
- **५) अप.क्र. ५१०/२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वी मध्ये सोन्याचे दगिने व चांदीच्या भांडयासह** , रोख रक्कम १,५०,०००/— रुपये असा मुद्देमाल चोरीस गेला होता. **मिळालेला मुद्देमाल ६८.५ मिलीग्रम पिवळ्या धातुची लगड किंमत ५,००,०००/— रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**
- **६) अप क्र. ६७३/२४ कलम ३३१(३)(४),३०५(अ) भा.न्या.संहीता मध्ये सोन्या चांदीचे दागिने असा मुद्देमाल चोरीस गेला होता. मिळालेला मुद्देमाल पिवळ्या धातुची लगड ३९ ग्रॅम किंमती ३,१५०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**
- **७) अप. क्र. ५०२/२४ कलम ४५४,३८० भा.द.वी मध्ये** चोरी गेलेला मुद्देमाल एक नग एच पी. (२०२३) कंपनीचा लॅपटॉप २२,०००/— रुपये **मिळालेला मुद्देमाल एच पी. (२०२३) लॅपटॉप एक नग २२,०००/— रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**
- ८) **अप.क्र ३०५/२५ कलम ३३१(४),३०५(अ),६१ भा.न्या.संहीता मध्ये** एस.बी. आय. ए.टी.एम च्या केबीन मध्ये प्रवेश करुन ए.टी.एम मशीन फोडण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले.

**सदर कारवाईत एकुण ८ गुन्हे उघड झाले असुन सोन्या चांदीच्या ऐवजांसह ,एक लॉपटॉप आणि दोन मोटारसायकल असा एकुण १२,०५६,५०/— रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपास सावनेर पोलीस करीत आहेत.**

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

## सावनेर पोलीसांची कामगिरी

पो.स्टे. सावनेर :— दिनांक १७/०४/२०२५ सावनेर पोलीसांना मुखबिरव्दारे विश्वसनीय माहीती प्राप्त झाली कि, आरोपी नामे **प्रफुल गौतम भिमटे , वय ३३ वर्ष रा. तन्मय बार चा मागे, वाघोडा सावनेर, याचेजवळ अवैध शस्त्र आहे**. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी तन्मय बार चा मागे , वाघोडा सावनेर, येथे गेले असता त्यांना नमुद आरोपी मिळुन आला पोलीसांनी पंचासमक्ष झडती घेतली असता पोलीसांना **१) एक लोखंडी ऐअर गन किंमत ४२,०००/— रूपये, २) २० लोंखडी छर्रे अंदाजे किंमत ४००/—रुपये,३) ४ लोंखंडी बॉबीन किंमत ४०/—रुपये ,५) .एक लोखडी सिंगल नळी असलेली ऐअर गन किंमत ७०००/—रुपये ५) ०२ लहान लोखंडी खाली गॅस गन सिलेंडर प्रत्येकी १५०/—रुपये असा एकूण ४९,७४०/ रु चा माल मिळुन आल्याने नमुद मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपी नामे **प्रफुल गौतम भिमटे , वय ३३ वर्ष रा. तन्मय बार चा मागे, वाघोडा सावनेर याचे वर शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने